MHSO200023552022

दाखल तारीख – १७/१०/२०२२
नोंदणी तारीख – १७/१०/२०२२
निकाल तारीख – २२/०५/२०२६
कालावधी – वर्षे महिने दिवस
०३ ०७ ०५

**पार्ट 'अ'**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सांगोला, जि. सोलापूर यांचे न्यायालयात**

**( पीठासीन अधिकारीः– श्रीमती पी. आर. कुलकर्णी )**

दि. २२ मे २०२६

नियमीत फौजदारी खटला क्र.४६४/२०२२ निशाणी क्र.

सांगोला पोलीस ठाणे गु. र. क्र. १४०८/२०२१

**अभियोग पक्ष** : महाराष्ट्र सरकार तर्फे
सांगोला पोलीस ठाणे,
ता. सांगोला, जि. सोलापूर.

**अभियोग पक्षातर्फे** : सहा. सरकारी अभियोक्ता श्री. मुजावर

**विरुध्द**

**आरोपी** : अशोक तुकाराम लवटे,
वयः ५० वर्षे, धंदाः शेती,
रा. जुनी लोटेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर.

**आरोपी तर्फे** : ॲड. श्री. एस. व्ही. पडळकर

**पार्ट 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | १६/११/२०२१ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | १७/११/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १७/१०/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २१/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय आरक्षीत केल्याची तारीख | २१/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय तारीख | २२/०५/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

**आरोपींचा तपशील**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सुटल्याचा दिनांक | दोषारोप ठेवल्याचे कलम | आरोपी निर्दोष की दोषी ? | शिक्षेचा तपशील | शिक्षेत सुट. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अशोक तुकाराम लवटे | -- | -- | भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ प्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |

## पार्ट 'क'
## अभियोग पक्षाचे साक्षादारांची यादी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | मच्छींद्र संभाजी लवटे | फिर्यादी, नि.१९ |

आरोपीतर्फे पुरावा देण्यात आला नाही. न्यायालयीन साक्षीदारांकडून पुढील पुरावा नाही.

**अभियोग पक्षातर्फे/बचाव पक्षातर्फे/न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी.**

**अ. अभियोग पक्ष.**

| अ. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ब. बचाव पक्ष.**

| अ. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | २० | घटनास्थळ पंचनामा |
| २. | २१ | जप्ती पंचनामा |
| ३. | २२ | वैद्यकीय प्रमाणपत्र |

**क. न्यायालयातर्फे.**

| अ. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल | तपशील |
|---|---|---|
| १. | पोलिस ठाणे मालमत्ता नोंदवही क्र. ८२/२०२१ | एक लोखंडी रॉड (सळई) त्याची लांबी अंदाजे अडिच फुट लांबीचा |

---

## न्यायनिर्णय
( पारित दिनांक २२/०५/२०२६ )

प्रस्तुतचा खटला आरोपीचे विरुध्द भारतीय दंड संहिता कलम भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये चालविण्यात आला. यातील आणखी एक आरोपी हे विधीसंघर्ष बालक असलेमुळे त्यांचे विरुध्दचा दोषारोपपत्र बाल न्यायालय यांचे समोर हजर करण्यात आले.

२. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की, फिर्यादी मच्छींद्र संभाजी लवटे, रा. जुनी लोटेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर हा दि. १६/११/२०२१ रोजी दुपारी २.००

वा.चे सुमारास त्याचे शेतातील गव्हाचे पिकास पाणी देण्यासाठी गेला. पाणी देत असताना शेजारील शेतकरी काशीनाथ लवटे यांचे शेतात सायंकाळी ५.०० वा.चे सुमारास अशोक लवटे व त्याचा मुलगा विधीसंघर्ष बालक असे त्यांचा ट्रॅक्टर रोटरनेसाठी आले. त्यावेळी त्यांचे शेतात ट्रॅक्टरने रोटरत असताना सायंकाळी ७.०० वा. चे सुमारास अशोक लवटे यांचे ट्रॅक्टरचे रोटरने काशीनाथ लवटे यांचे शेतामधून फिर्यादीची आलेली पाईप लाईन हि अचानक फुटल्यामुळे फिर्यादीचे गव्हाचे पिकास पाणी देत असल्याने ते अचानक बंद झाल्याने ते पाहत असताना काशीनाथ लवटे यांचे शेतामध्ये फिर्यादीची पाईप लाईन फुटली होती. त्यावेळी फिर्यादी ट्रॅक्टर चालक विधीसंघर्ष बालक यास "माझी पाईपलाईन कशी फोडली" असे म्हणत असताना त्यावेळी अशोक लवटे "तुमची पाईप लाईन दिसली नसल्याने फुटली आहे" असे म्हणाला. फिर्यादीस त्यास "पाईपलाईल दुरुस्त करुन द्या व नंतर ट्रॅक्टरने रोटरा" असे म्हणत असताना अशोक लवटे याने फिर्यादीस धरले व त्याचा मुलगा विधीसंघर्ष बालक याने ट्रॅक्टर मधील लोखंडी रॉड आणून फिर्यादीचे डोकीत मारुन जखमी केले. त्यावेळी फिर्यादी आरडा ओरडा करीत असताना व भांडणाचा आवाज ऐकून शेजारील शेतकरी नवनाथ शेंबडे, श्रीरंग लवटे असे पळत आले व त्यांनी भांडणे सोडविले. त्यावेळी अशोक लवटे व त्यांचा मुलगा विधीसंघर्ष बालक यांनी भांडण सोडवित असताना फिर्यादीस हाताने लाथाबुक्यानी मारहाण करुन "तु आमचा येथून पुढे ट्रॅक्टर आडवून तर बघ तुला बघून घेतो तुला सोडत नाही" अशी धमकी देवून शिवीगाळ दिली. फिर्यादीच्या डोकीतून रक्त येवू लागले. म्हणून फिर्यादीने आरोपीविरुध्द पोलिसा तक्रार केली.

३. प्रस्तुत फिर्यादवरुन आरोपीविरुध्द गु.र.क्र.१४०८/२०२१ अन्वये भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पो.हे.कॉ. व्ही.एन. क्षिरसागर/२६४, सांगोला पोलिस स्टेशन यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान तपास अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा केला, वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केला, जप्ती पंचनामा करुन मुद्देमाल जप्त केला. आरोपींना अटक केली आणि साक्षीदारांचे जबाब नोंदवून तपासाअंती न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले.

४. आरोपी न्यायालयात हजर झाले. आरोपीचे विरुध्द दोषारोप (नि.१४) निश्चित करुन त्यातील मजकूर आरोपीस वाचून व समजावून सांगण्यात आले असता त्यांनी गुन्हा

नाकबूल करुन संपरिक्षा चालविण्याची विनंती केली. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अन्वये जबाब नोंदवण्यात आले नाही.

५. उभय पक्षांचे युक्तिवाद ऐकले. अभिलेखाची सखोल शहानिशा केली. न्यायनिर्णयासाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील निष्कर्ष व कारणमीमांसा खालीलप्रमाणे देत आहेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, आरोपींनी संगनमताने त्यांचे समान उद्देश साधण्याकरीता दि.१६/११/२०२१ रोजी सायंकाळी ७.०० वाजण्याचे सुमारास जुनी लोटेवाडी, ता. सांगोला येथील फिर्यादीचे शेताजवळील कच्च्या रोडवर आरोपीने फिर्यादीस धरले व विधीसंघर्ष बालक याने लोखंडी रॉडने फिर्यादीस मारुन इच्छापूर्वक दुखापत व जखमी केली ? | नाही. |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी आपसी संगनमताने त्यांचे समान उद्देश साधण्याकरीता फिर्यादीस हाताने व लाथाबुक्याने मारहाण केले व त्यांना इच्छापूर्वक दुखापत केली ? | नाही. |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी आपसी संगनमताने त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करणेसाठी फिर्यादीस शिवीगाळ केला, त्यांचा अपमान केला व त्यानुसार त्यांना उद्देशून व माहित असताना प्रक्षोभित केले, ज्यामुळे सार्वजनिक शांततेचा भंग किंवा इतर गुन्हा घडू शकला असता ? | नाही. |
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगनमताने त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करणेसाठी फिर्यादीस दमदाटी करुन फौजदारीपात्र धाकदपटशा केला ? | नाही. |
| ५. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ६ करीता</u> –**

६. उपरोक्त सर्व मुद्दे हे ऐकमेकांशी संबंधित असल्याने पुराव्याची पूनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतपणे चर्चेकरिता घेतले आहेत. आरोपीवरील आरोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले एकमेव साक्षीदार क्र.१ फिर्यादी मच्छींद्र संभाजी लवटे (नि.१९) यांनी सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, आरोपी हे त्याचे

नातेवाईक व शेजारी असून तो आरोपींना ओळखतो. दि.१६/११/२०२१ रोजी संध्याकाळी ६.३० वाजता तो कोठे होता व काय घडले हे त्यास आठवत नाही. फिर्यादीने अभिलेखावरील फिर्याद व प्रथम खबर अहवालावरील त्याची सही ओळखून त्यातील मजकूर माहित नसल्याचे कथन केले. त्याने गैरसमजूतीतून फिर्याद दाखल केली होती. फिर्यादीने अभियोग पक्षास समर्थन केले नाही. विद्वान सरकारी वकील यांनी परवानगीने उलट तपासाच्या स्वरूपाचे प्रश्न सदर फिर्यादीला विचारले. परंतु अभियोग पक्षास पुरक असे काहीही फिर्यादीच्या साक्षीतून निष्पन्न झाले नाही.

७. फिर्यादीच्या एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, फिर्यादीची साक्ष एकसंध व सुस्पष्ट नाही. फिर्यादीने गैरसमजूतीतून फिर्याद दिल्याचे व कथित घटनेबाबत कथन केल्याचे दिसुन येते. त्यामुळे घटनेबाबत एकंदरीत साशंकता निर्माण होते. तसेच फिर्यादीची साक्ष विश्वासार्ह वाटत नाही. सबब, अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या पुराव्यावरुन घटनेबाबत कोणताही विश्वसनीय पुरावा अभिलेखावर आल्याचे दिसून येत नाही. आरोपींनी संगनमताने फिर्यादीला लोखंडी रॉडने, लाथाबुक्याने मारहाण करुन जखमी केले असे अभियोग पक्षाच्या साक्षीदाराच्या पुराव्यातून निष्पन्न होत नाही. फिर्यादी व आरोपीने निशाणी क्र.२३ कडे तडजोड पुरसीस दाखल केले आहे. सदर पुरसीसचे अवलोकन करता प्रस्तुतचे प्रकरण फिर्यादी व आरोपीचे दरम्यान न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे स्पष्ट होते. अभियोग पक्षाला आरोपीस गुन्हयामध्ये गोवण्याइतपत पुरावा अभिलेखावर आणता आलेला नाही. त्यामुळे आरोपींना दोषी धरण्याइतपत कोणताही सबळ पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही.

८. फिर्यादीने त्याचे उलटतपासात तडजोड पुरसिस प्रमाणे फिर्यादीची आरोपींसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे देखील मान्य केलेले आहे. त्यामुळे आरोपींचा गुन्हयातील सहभाग सिध्द होत नाही. त्यामुळे उपलब्ध असलेल्या साक्षी पुराव्यावरून भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ चे आवश्यक घटक सर्व शंकांच्या पलीकडे जाऊन सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. सबब, उपलब्ध असलेल्या पुराव्याआधारे तसेच उभय पक्षांमधील झालेली तडजोड या बाबींचा विचार करता आरोपींच्या विरोधात निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. आरोपीच्या वतीने

घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२०, जप्ती पंचनामा २१, वैद्यकीय प्रमाणपत्र नि.क्र.२२ मान्य केले असले तरी केवळ सदर कागदपत्रांआधारे आरोपींनी गुन्हा केला असा निष्कर्ष काढता येणार नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दे क्र.१ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहेत. अभियोग पक्षाचे साक्षीदार व आरोपी यांनी चांगले संबंध ठेवण्यासाठी तडजोड केल्याचे दिसुन येते. सबब अभियोग पक्षाच्या साक्षीदारांनी अभियोग पक्षास समर्थन केले नाही. या कारणास्तव त्यांच्याविरुध्द कारवाई करणे उचित होणार नाही. उपरोक्त मुद्यांच्या निष्कर्षांवरून आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र.५ च्या उत्तरार्थ मी खालील आदेश पारीत करत आहे.

## – <u>आदेश</u> –

१. आरोपी अशोक तुकाराम लवटे यांना भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपांमधून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रकरणात आरोपीने यापूर्वी दिलेला जामिन व जात मुचलका फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ४३७–अ नुसार पुढील सहा महिन्यांकरीता कायम करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल पोलिस ठाणे मालमत्ता नोंदवही क्र. ८२/२०२१ हे मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे.

(खटल्याचा निकाल खुल्या न्यायालयात देण्यात आला.)

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.05.22 15:32:35 +0530

ठिकाण : सांगोला　　　　( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )
दिनांक : २२/०५/२०२६　　　　प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सांगोला.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Civil Judge, J.D. & J.M.F.C. Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 22/05/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 22/05/2026 |